## संपादकीय....

# लाडकी बहीण योजनेत विरोधाभास

## मेहनत करणाऱ्या महिलांना पगार कमी, घरबसल्या जास्त!

महाराष्ट्र राज्य कल्याणकारी असल्याची अनेक उदाहरणे आहेत. मात्र, याच राज्यात महिला व बाल विकास आयुक्तालय अंतर्गत विविध सरकारी व खासगी संस्थांमधील हजारो निराधार, अनाथ महिला मात्र, लाडकी बहीण योजने पासून वंचित आहेत. तर भिक्षेकरी स्विकार केंद्रातील महिलांना दिवसभर काम करून पाच रूपये मोबदला मिळतो. तर लाडकी बहिण योजनेत राज्य सरकार महिलांना काम न करता प्रतिदिन पन्नास रूपये अर्थात दीड हजार रूपये महिना भेट देणार आहे. हा विरोधाभास राज्यात दिसून येत आहे. आता तर जिल्हा परिषदेच्या शिक्षिकांनी लाडकी बहीण योजनेचा फायदा घेतला आहे.

राज्य सरकारच्या वतीने लाडकी बहिण योजनेसाठी युद्धपातळीवर महिलांची नोंद करण्यात आली.या योजनेत जास्तीत जास्त बहिणींना लाभ मिळावा म्हणून राज्य सरकार प्रयत्नशील होते. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषद, महापालिकास्तरावर लाडकी बहिण योजने अंतर्गत महिलांची नोंद केली गेली. सर्व धामधुमीत कल्याणकारी सरकार असल्याचा डंका वाजविणाऱ्या सरकारच्या दिव्याखालीच अंधार असल्याचे दिसून येते. राज्यातील महिला व बाल विकास आयुक्ताल अंतर्गत सरकारी व खासगी संस्थांमध्ये हजारो निराधार, अनाथ १८ वर्षांपुढील युवती, महिला व ज्येष्ठ नागरिक आश्रयाला आहेत. या महिलांकडे मात्र , सरकारचे पूर्णत: दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. त्यामुळे गरजू व खऱ्या लाभार्थ्यांना लाडकी बहिणी योजनेचा लाभ मिळत नसल्याचे वास्तव समोर आले आहे. त्यामुळे या महिलांना लाडक्या बहिणीचा लाभ मिळाल्यास भविष्यात त्यांना फायदा होऊ शकतो.

**भिक्षेकरी स्विकार केंद्रात काम करून प्रतिदिन पाच रूपये**

राज्यातील भिक्षेकरी स्विकार केंद्रात न्यायालयाच्या आदेशाने महिलांना दाखल केले जाते. या महिलांना शिवणकाम, झाडू बनविणे आदी कामे दिली जातात. या कामाच्या मोबदल्यात त्यांना प्रतिदिन पाच रूपये पगार दिला जातो. तर लाडकी बहिण योजने अंतर्गत महिलांना काम न करता प्रतिदिन पन्नास रूपये अर्थात महिन्याला दीड हजार रूपये पगार दिला जातो. हा विरोधाभास सरकार कसा दूर करणार हा मुख्य प्रश्न आहे. याचे उत्तर तरी आता राज्याच्या महिला व बाल विकास आयुक्तालाकडे नाही.

**कारागृहातील महिला कैद्यांना सुद्धा हवी लाडकी बहिण योजनेचा लाभ**

राज्यातील कारागृहातील महिला कैद्यांना सुद्धा लाडकी बहिण योजनेचा लाभ हवा आहे. कारागृहातील व खुल्या कारागृहातील महिलांना आठ तास काम केल्यानंतर ५५ ते ७२ रूपया पर्यंत प्रतिदिन मजुरी दिली जाते. त्यामुळे राज्यातील महिला कारागृहातील शेकडो महिला कैद्यांनी लाडकी बहिणी योजनेचा लाभ मिळावा, अशी मागणी करीत आहेत. या बाबत कारागृह प्रशासनाने कानावर हात ठेवले आहेत. महिला कैद्यांना लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळू शकत नाही, अशी भूमिका घेतली आहे.

**बऱ्या झालेल्या मनोरुग्ण महिला सुद्धा लाडकी बहिण योजनेपासून वंचित**

राज्यातील ठाणे, येरवडा, रत्नागिरी आणि नागपूर अशा चार ठिकाणी मनोरुग्णालये आहेत. या चार मनोरूग्णालयात बऱ्या झालेल्या शेकडो बऱ्या झालेल्या मनोरुग्ण महिला आहेत. या महिलांच्या पुनर्वसनासाठी रुग्णालया प्रशासन प्रयत्नशील असते. अशा महिलांना लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळाल्यास त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकतो. मात्र, या महिलाच लाडकी बहिण योजनेपासून वंचित ठेवले आहे.

**समाजकल्याणच्या वस्तीगृहातील विद्यार्थीनीही वंचित**

राज्यातील समाजकल्याण विभागांच्या वस्तीगृहात अनुसूचित जमाती व अनुसूचित जातीच्या अठरा वर्षांच्या पुढील हजारो युवती आहेत. या युवतींना लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळणार या बाबत समाजकल्याण विभाग संभ्रमावस्थेत आहेत. त्यामुळे राज्य सरकारची लाडकी बहिण योजनेतील लाभार्थ्यांची व्याख्या अधिक सविस्तर करण्याची आवश्यकता असल्याचे स्वयंसेवी संस्थांचे मत आहे. मात्र खिलाफत वाटले गेले आहे.

या विरोधाभासामुळे सरकारच्या कल्याणकारी प्रतिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जर प्रत्यक्ष काम करणाऱ्या महिलांना इतके कमी लाभ दिले जात असतील आणि घरबसल्या मिळणारा मोबदला त्याहून जास्त असेल, तर धोरणाचा मूळ उद्देश – गरजूंच्या जीवनात सुधारणा करणे – पूर्ण होत नाही. या विरोधाभासावर त्वरित सुधारणा करणे अत्यावश्यक आहे.

स्थानिक स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक या मुद्यावर लक्ष ठेवून आहेत. सरकारने लाडकी बहीण योजनेत गरजू व खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी तातडीने धोरणातील शिथिलता दूर करावी, अन्यथा योजना केवळ नांवापुरती मर्यादित ठरू शकते. वास्तविक बदलासाठी राज्य स्तरावर धोरणाचा पुनरावलोकन आवश्यक आहे.


# एक लाख १२ हजार वनस्पतींच्या नमुन्यांचे डिजिटायझेशन

## एकही रूपया खर्च न करता सहा महिन्यात विद्यार्थ्यांनी सरकारचे एक कोटी ६८ लाख रूपयांची केली बचत

महाराष्ट्र , गोवा व कर्नाटक या तीन राज्यातील तब्बल एक लाख १२ हजार वनस्पतींचे (हर्बेरियम) नमुन्यांचे डिजिटायझेशन केले आहे. एक ही रूपया खर्च न करता विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी सहा महिन्यात हे संकलन केल्याची माहिती भारतीय वनस्पती सर्वेक्षण (बॉटनिकल सर्वे ऑफ इंडिया) अर्थात बीएसआयचे प्रभारी अधिकारी डॉ. ए बेंनियामिन यांनी सागितले.

भारतात वनस्पतींचे असंख्य नमुने आढळतात. यातील अनेक नमुन्यांचा अजून शोध सुरूच आहेत. ' बीएसआय'ने महाराष्ट्र ? गोवा व कर्नाटक राज्यातील सह्याद्री पर्वत रांगेत, महाबळेश्वर, कोकण भागात अनेक दुर्मिळ वनस्पतीच्या नमुन्यांचे संकलन केले आहे. पुणे येथील बीएसआयने एक लाख १२ हजार वनस्पतींच्या (हर्बे रियम) संकलन केले आहे. या अमूल्य ठेव्याचे डिजिटायझेशन करणे आवश्यक होते. त्यासाठी पुणे शहरातील महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना आवाहान केले होते. याला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.विद्यार्थ्यांनी संगणकाच्या मदतीने प्रत्येक वनस्पतीचे छायाचित्रांसह माहितीची नोंद केली गेली. प्रत्येक बॅचमध्ये वीस विद्यार्थ्यांनी सोमवार ते शुक्रवार दरम्यान वनस्पतींचे डिजिटायझेशन केले. डिझिटायझेशनचे काम जर खासगी संस्थेला दिले असते तर त्यांनी एका वनस्पतीचे डिजिटायझेशनसाठी दीडशे रूपये दर आकारला असता. त्यामुळे एक लाख १२ हजार वनस्पतीचे एक कोटी ६८ लाख रूपये खर्च झाले असते. मात्र, विद्यार्थ्याच्या उस्फूर्त प्रतिसादामुळे एकही रूपया खर्च करता आले नाही. सरकारचे पैसे ही वाचले व विद्यार्थ्याना वनस्पतींचा समृध्द खजीना अनुभवता आला. याचा उपयोग विद्यार्थ्यांना भविष्यात संशोधनासाठी होऊ शकतो, असे डॉ बेनियामिन यांनी सांगितले.

**डॉ. ए. बेनियामिन,**
**प्रभारी अधिकारी, भारतीय वनस्पती सर्वेक्षण**






**“ महाराष्ट्र, गौवा आणि कर्नाटक विविघ वनस्पतींनी समृध्द आहे. यातील अनेक वनस्पती दुर्मिळ आहेत. संशोधक आजही नवनवीन वनस्पतींच्या शोधात आहेत. भारतीय वनस्पती सर्वेक्षणकडे असलेल्या एक लाख १२ हजार वनस्पती ( हर्बेरियम) नमुन्यांचे डिजिटायझेशन केले आहे. त्यामुळे पुढील कित्येक शतकानंतरही वनस्पतींची संपुर्ण माहिती एक क्लिकमध्ये मिळू शकते.**

### ऐंशी ते शंभर वर्षापूर्वीच्या वनस्पतीचे नमुने

**भारतीय वनस्पती सर्वेक्षणकडे महाराष्ट्रातीस अतिदुर्मिळ वनस्पतीचे नमुने संग्रहित आहेत. प्रत्येक वनस्पतीचे नमुने सुरक्षित लॉकरमध्यो ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे लुप्त झालेल्या वनस्पतीचे नमुने सुद्धा या ठिकाणी पाहण्यास मिळतात.**

## आठवणीतले पुणे...








१. कॅम्प परिसरातील घासीराम कोतवाल यांचा वाडा, आता तो सैन्यदल च्या ताब्यात आहे
२. महात्मा फुले मंडई
३. साठे बेकरीज लिमिटेड : स्थापना १ जून १९७३ : शक्ती ब्रेड व इतर बेकरी उत्पादने

# केबल मोबाईल कंपन्यांचे; भूर्दंड महापालिकेला!

## विजेच्या खांबावरुन बेकायदा केबलचे जाळे; उपनगरातील वास्तव

पुण्याचे उपनगर आता केवळ रहिवासी आणि वाहतूक यासाठीच नव्हे, तर मोबाईल कंपन्यांच्या ऑप्टीकल फायबर, तांब्याच्या ताऱ्यांच्या आणि केबल टीव्हीच्या वाहिन्यांच्या जाळ्यांसाठीही ओळखले जात आहे. महापालिकेच्या पथदिव्यांचे खांब आता या कंपन्यांसाठी 'तंत्रज्ञानाचे झाड' बनले आहे. दिवे आणि खांब यांचा वापर करून कंपन्या रात्रीच्या वेळी बिनविरोध केबल टाकत असतात, तर महापालिका प्रत्यक्षात या 'आधारे' होणाऱ्या आर्थिक नुकसानीकडे दुर्लक्ष करत आहे.

शहरातील पंधरा क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील पथदिव्यांच्या खांबावरुन या केबल वाहिन्यांचे जाळे तुटत नाही, उलट वाढतच चालले आहे. दिवे तुटतात, खांब तिरप्या होतात, आणि काहीवेळा खांबावरून दिवे खाली पडतात. मात्र मोबाईल कंपन्यांना हा धोकाच काही वाटत नाही. रात्रभर एका खांबावरून दुसऱ्या खांबावर केबल ओढण्यात येतात; काही ठिकाणी खांब तिरप्या होतात तर दिवे पडतात, पण कंपन्यांच्या कर्मचार्यांना त्याची काही पर्वा नाही.

विद्युत विभागाला या जाळ्यांमुळे मोठा आर्थिक भूर्दंड बसतो. महापालिकेच्या गणनेनुसार, फक्त पथदिव्यांचे नुकसान भरून काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. दिवे बदलण्यासाठी लागणारी सामग्री, कामगारांची मजुरी आणि तुटलेले खांब पुन्हा बसवण्याचा खर्च दरवर्षी करोडो रुपयांत मोजला जातो. तरीही, शहरातील उपनगरांतील अनेक भागांमध्ये मोबाईल कंपन्या आणि केबल टीव्ही वाहिन्यांच्या जाळ्यांसाठी खांब वापरत राहतात. नागरिकांनी या समस्येबाबत महा पालिकेकडे अनेक वेळा तक्रार केली आहे. पण आकाशचिन्ह विभाग, विद्युत विभाग आणि अतिक्रमण विभाग यामध्ये समन्वय न राहिल्यामुळे कारवाई फारशी होत नाही. नागरिकांच्या तक्रारींवर मात्र काही गंभीर प्रतिसाद मिळत नाही. उपनगरात रात्री वाहनांची संख्या कमी असते, त्यामुळे कंपन्या रात्रभर केबल टाकण्यात मोकळ्या आहेत.

केवळ मोबाईल कंपन्या नव्हे, तर काही माजी नगरसेवकांनीही आपली चमकोगिरी करण्यासाठी 'आय लव्ह' असे बिनविरोध विद्युत फलक पथदिव्यावर लावले आहेत. या फलकांसाठी वीज जोडली गेली असून, त्याचाही खर्च महापालिकेच्या खिश्यातुन जातो. विद्युत विभागाचे अधिकारी सांगतात की, या फलकांमुळे महा पालिकेच्या वीज बिलात दरमहाना मोठी वाढ होते.

विद्युत विभागाने या सर्व खांबांवरील केबल, फलक आणि वाहिन्यांची नोंद घेऊन यावर कारवाई करण्याचे ठरवले आहे. उपनगरांतील पथदिव्यांवर कोणकोणत्या कंपन्यांनी वीज जोडली आहे, कोणत्या फलकासाठी आणि किती केबल लावली आहेत, याची संपूर्ण यादी तयार केली जात आहे. या यादीवरून वीज जोड तोडणे, फलक काढणे आणि बेकायदा वाहिन्या हटविणे यासाठी महा पालिकेतून कारवाई होणार आहे. पुण्यातील ही परिस्थिती केवळ आर्थिक नुकसानीपुरती मर्यादित नाही; शहराचे सौंदर्यही या जाळ्यांमुळे ढवळले आहे. पथदिव्यांच्या खांबावरुन केबल वाहिन्यांचे जाळे पसरल्याने शहरातील दृश्य अव्यवस्थित आणि असुरक्षित दिसते. दिवे तुटल्यामुळे रस्ते अंधारमय राहतात, नागरिकांसाठी चालणे आणि वाहतूक सुरक्षित ठेवणे कठीण होते. त्यामुळे या समस्येला तातडीने हाताळणे महत्त्वाचे आहे.

तसेच, नागरिक आणि स्थानिक स्वयंसेवी संस्थांनी महा पालिकेला याबाबत सतर्क केले आहे. अनेकांनी म्हटले आहे की, मोबाईल कंपन्यांना पथदिव्यांचा वापर थांबवावा लागेल, अन्यथा शहरातील सौंदर्य आणि सुरक्षितता दोन्ही धोक्यात येईल. महापालिका आणि संबंधित विभागांनी एकत्र येऊन या समस्येवर तातडीने नियंत्रण ठेवावे, असा नागरिकांचा इशारा आहे. शहरातील उपनगरांमध्ये ३००-४०० किलो मीटर अंतरावरील रस्त्यांवर ही केबल वाहिन्यांची समस्या दिसते. यातून शहरात पसरलेल्या बेकायदा वाहिन्यांचा प्रमाण आणि आर्थिक नुकसान स्पष्ट होते. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी महापालिकेला तत्पर कारवाई करणे गरजेचे आहे. शहरातील नागरिकांचे म्हणणे आहे की, जर महापालिकेने आता योग्य ती कारवाई केली नाही, तर या प्रकारचा विरोधाभास आणखी वाढेल. मोबाईल कंपन्या व केबल टिव्हीच्या वाहिन्यांवर नियंत्रण न राहिल्यास, शहरातील पथदिव्यांचे नुकसान, अपघात, अंधारमय रस्ते आणि आर्थिक नुकसानीचा चक्र चालू राहणार आहे. विद्युत विभागाचे अधिकारी सांगतात, संपूर्ण यादी तयार केल्यावर उपनगरातील पथदिव्यांवरील बेकायदा केबल आणि फलक हटवण्यात येणार आहेत. नागरिकांनी सुरक्षिततेसाठी या कारवाईला सहकार्य करावे.

शेवटी नागरिकांचा आवाज असा आहे की, शहराचे सौंदर्य जपणे, अपघात टाळणे आणि महापालिकेच्या पैशांचा योग्य वापर सुनिश्चित करणे हाच या कारवाईचा मुख्य उद्देश असावा.

### आय लव्ह...' फलकासाठी वीजचोरी!

**उपनगरांतील माजी नगरसेवकांनी चमकोगिरी करण्यासाठी चौकाचौकात बेकायदा 'आय लव्ह...'चे विद्युत फलक लावले आहेत. या फलकांना त्यांनी बिनदिक्कतपणे पथदिव्यातून वीज चोरी केली आहे. त्यामुळे महापालिकेच्या दरमहा येणाऱ्या बीलाची रक्कम वाढली आहे. त्यामुळे सर्व क्षेत्रीय कार्यालये, पथदिव्यांतून घेतलेल्या वीजजोडची यादी द्या, त्यावर कारवाई करुन वीजजोड तोडू टाकणार असल्याचे विद्युत विभागाचे कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले.**

# डेक्कन कॉलेज पुरातत्व वस्तूंची रिप्लिका (प्रतिकृती) तयार करून विक्री करणार

## सिंधू संस्कृति व देशभरातील उत्खननात सापडलेल्या वस्तू घर व कार्यालयांच्या इंटिरियर मध्ये स्थान मिळविणार

सिंधु संस्कृतीची उदय हडप्पा व मोहेजदडो या शहरातून झाली. हे शहर स्थापत्यशास्त्राचा एक सुंदर नमुना होता. या शहराच्या उत्खननात अनेक प्राचिन वस्तू पुरातत्व विभागाला सापडल्या. यामध्ये मुर्त्या, माणिक व मोतीचे दागिने, भांडी, खेळणी, टेराकोटाच्या मुर्त्यांचा समावेश होता. अशा अनेक वस्तू डेक्कन कॅलेजच्या पुरातत्व संग्रहालयात आहेत. यासह महाराष्ट्रातील व देशभरात विविध ठिकाणी झालेल्या उत्खननात शेकडो वस्तू सापडल्या आहेत. या वस्तूंचे पुरातत्वदृष्ट्या अधिक महत्व आहे. पण या वस्तूंच्या प्रतिकृती ( रिप्लिका) जर तयार केल्या तर त्याला मागणी मोठी असेल व त्यातून उत्पन्न सुद्धा मिळू शकते. त्यामुळे डेक्कन कॉलेज पुरातत्व वस्तूंच्या प्रतिकृती तयार करण्याच्या विचारात आहे.

ग्रामिण असो वा शहर प्रत्येकाला घरात किंवा कार्यालयात शोभेच्या वस्तू ठेवण्यावर भर असतो. त्यात जर का वस्तू ही पुरातत्व काळातील असेल तर अशा वस्तू दर्शनी भागात ठेवण्यावर अनेकांचा भर असतो. आता तर कार्पोरेट युगात हस्तचित्र, पेटिंग, पोर्टरेट आणि रिप्लिंकाना अधिक महत्व दिले जाते. जगभरात या वस्तूंना प्रचंड मागणी आहे. त्यामुळे डेक्कन कॅलेज पुरातत्व विभाग त्यांच्याकडे असलेल्या शेकडो वस्तूंच्या प्रतिकृती ( रिप्लिका) तयार करणार आहेत. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना या वस्तूंच्या निर्मिती बरोबरच रिप्लिकांचे उत्पादन होणार आहे. यासह इतर लघु उद्योजकांना या वस्तूंच्या उत्पादनाची संधी मिळणार आहे.

**“ डेक्कन कॉलेज पुरातत्व विभागात गेली अनेक वर्ष महाराष्ट्रासह देशभरातील उत्खननात अनेक वस्तू सापडल्या आहेत. अशा वस्तूंच्या प्रतिकृती (रिप्लिका) बनविण्याच्या विचारात आहोत. अशा वस्तूंना देश व विदेशात मोठी मागणी आहे. यातून लघुउद्योजकांना मोठी संधी मिळेल व कॅलेजच्या उत्पन्नात भर पडेल.**
**डेक्कन कॅलेज, पुणे**

### रिप्लिकांची ऑनलाईन विक्रीला मोठा प्रतिसाद

**देशभरात ग्रीक पॉटरी, कॅईन्स, मूर्त्या, ब्रॉझच्या मूर्त्या, टेराकोटाच्या मुर्त्या, माणिक व मोतीचे दागिने अशा अनेक वस्तूंच्या प्रतिकृतींचा ( रिप्लिका) यात समावेश आहे. या वस्तू एक हजारापासून ते लाखो रूपयांपर्यंत त्यांच्या किंमती आहेत.**

'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे– ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंन्ड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.
वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.
मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे – ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com